**Bachelor of Arts (B.A.) Part—I First Semester Examination**

**MARATHI (Literature)**

**Optional Paper—1**

835

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 80

**सूचना** :- (1) **पाच**ही प्रश्न सोडविणे अनिवार्य आहेत.

(2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

1. कादंबरीचे स्वरूप स्पष्ट करून कादंबरीच्या घटकांची चर्चा करा.

**किंवा**

'तहान' या कांदबरीत समाजवास्तवता कशी आली आहे ? ते स्पष्ट करा. 16

2. कादंबरीचे प्रकार सांगून कादंबरी या साहित्यप्रकाराचे वेगळेपण स्पष्ट करा.

**किंवा**

'राघोजी' या व्यक्तिमत्वाचे विशेष सविस्तर लिहा. 16

3. खालीलपैकी कोणत्याही **एका** गटातील अवतरणांचे संदर्भासहित स्पष्टीकरण लिहा :

**गट 'अ'**

(क) "लेका मरणाचा चढ हाये पिराचा ........... बैलाची बेल्डी तुटून व्हशीन उलटा."

(ख) "आता आसं वर्गणी करूनच लढावं लागणार हाये आपल्याले. पहिलं निवेदन देऊन टाकू सरपंचाले".

(ग) "आता एकच इलाज हाये. तोटी खोलून पाणी कमी कर. मंग टँकर जरा धुरजड करून घेऊ..."

(घ) "तेच न मंग ? चार तिथी दोनच खेपा आणावं लागतीन. म्हण्जे वदवद कमीच झाली का नाई तुपली ! चाल येऊ सिनिमा पाहून. उठ !"

**किंवा**

**गट 'ब'**

(च) "त्यो माणूस आसं कावून म्हन्ते ? म्या गाव जाळलं म्हणून ? त्यानं जाळलं का काय गाव ?"

(छ) "आमाले काई साड्या नाई पाह्यजे; थम्स-अप, अंगुर, संतरं काईच नाई पाह्यजे..... फक्त पाणी पाह्यजे....."

(ज) "गड्या बबन ; पंखा आणून लाव मपल्या जवळ. लयेच गर्मी व्हायले लागली बिट्या."

(झ) "चाल व्हय घरी ! पाणी भरायले येत व्हती नं व तू. अन् इकडी आशी उखारी करत व्हती नाल्या खोल्या तून. मोकाट गावडी...." 16

4. कोणत्याही **एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा :

**गट 'क'**

(त) कथेचा मूलघटक 'निवेदन' या घटकाची चर्चा करा.

(थ) कथेच्या बांधणीत भाषेचे महत्व स्पष्ट करा.

(द) कवितेचे प्रकार थोडक्यात स्पष्ट करा.

(ध) 'सुनीत' आणि 'गझल' या काव्यप्रकारांविषयी माहिती लिहा.

**किंवा**

**गट 'ख'**

(प) कथेची व्याख्या व संकल्पना थोडक्यात स्पष्ट करा.

(फ) कादंबरी पेक्षा कथा वेगळी कशी असते ?

(ब) कवितेला काव्याचे स्वरूप प्राप्त करून देणाऱ्या आवश्यक घटकांची चर्चा करा.

(भ) 'सूचकत्व' या काव्यवैशिष्ट्याविषयी माहिती लिहा. 16

5. खालील सर्व प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा (**सर्व** प्रश्न अनिवार्य) :

(1) प्रमोद नेवले विषयी थोडक्यात लिहा.

(2) आईची सोन्याची पोथ विकायचा विचार बबन का करतो ?

(3) राघोजी अंगणात झोपायला नकार का देतो ?

(4) 'रत्ना' बद्दल थोडक्यात माहिती लिहा.

(5) कथेच्या 'अनुभवार्थ' या घटकाविषयी माहिती लिहा.

(6) कथेतील पात्र म्हणजे काय ?

(7) 'कविता' या साहित्यप्रकाराबद्दल थोडक्यात लिहा.

(8) 'विडंबन काव्य' हा काव्य प्रकार स्पष्ट करा. 16